दैनिक
# श्रमिक लोकराज्य
नांदेड,परभणी,लातूर,हिंगोली येथे वितरीत होणारे वृतपत्र

संपादक
ज्ञानेश्वर बालाजीराव डोईजड
मो.7875782377

कार्यकारी संपादक
वैजनाथ द.स्वामी
मो.8329736330

उपसंपादक
दत्ता पा.माळेगावे गोजेगावकर
मो.9766761475

नांदेड । दैनिक । वर्ष ५ । अंक १०५ । गुरुवार, दि.११ डिसेंबर २०२५ । RNI MAHMAR/2021/85782 । पाने ०४ । किंमत २ रूपये । ई–पेपर : www.shramiklokrajya.in

# "काय बोलायचं ते मी ठरवेन, तुम्ही सांगू नका..."

## अमित शाह-राहुल गांधींमध्ये लोकसभेत खडाजंगी



**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था -** संसदेच्या हिवाळी अधिवेशनात बुधवारी वातावरण तापले. लोकसभेत निवडणूक सुधारणांवरील चर्चेला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उत्तर दिले. त्यांचे भाषण सुरू करताना शाह म्हणाले की, भाजप सदस्य निवडणूक सुधारणांवरील चर्चेला मागेपुढे पाहत नाहीत. विरोधी पक्षनेते राहुल गांधी त्यांच्या जागेवरून उभे राहिले आणि त्यांनी शाह यांना आव्हान दिले. राहुल गांधींनीअमित शाह यांना सांगितले, "मी तुम्हाला मत चोरीच्या आरोप करणाऱ्या माझ्या तीन पत्रकार परिषदांवर चर्चा करण्याचे आव्हान देतो." त्यावर शाह यांनी उत्तर दिले, "मी कसे उत्तर द्यायचे ते मी ठरवेन. मी सर्व उत्तरे देईन. मी माझ्या भाषणाचा क्रम ठरवेन, विरोधी पक्षनेत्यांनी मला सांगू नये."

वोटचोरीची खोटी कहाणी रचली जातेय...

अमित शाह म्हणाले, "मी राहुल गांधींच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देईन. मी ३० वर्षांपासून संसदेत किंवा विधानसभेत निवडून आलो आहे. असे कधीही घडले नाही. मी माझ्या भाषणाचा क्रम ठरवेन, तुम्ही नाही. अचूक माहिती देणे आणि सर्व आरोपांना उत्तर देणे ही माझी जबाबदारी आहे. मी राहुल गांधींच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देत आहे. घुसखोर लोकांचा राज्याचे मुख्यमंत्री किंवा देशाचा पंतप्रधान ठरवण्याचा अधिकार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे SIRची निर्मिती झाली. मतदार कोण आहे हे ठरवणे हे निवडणूक आयोगाचे काम आहे. मतदार होण्यासाठी व्यक्ती प्रथम भारतीय नागरिक असणे आवश्यक आहे. राहुल गांधी ज्या हरयाणातील एका घराचा उल्लेख करतात तिथे निवडणूक आयोगाने पडताळणी केली, राहुल गांधींचा दावा खोटा निघाला. मत चोरीची खोटी कहाणी तयार करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामुळे विरोधकांकडून गोंधळ उडाला. अमित शहा म्हणाले, "मला माझे विधान पूर्ण करू द्या, नंतर विरोधी पक्षनेत्याला संधी द्या आणि मी त्याचे उत्तर देण्यास तयार आहे."

अमित शाह यांना थांबवून राहुल यांचे विधान

अमित शाह बोलत असतानाच राहुल गांधींनी त्यांना थांबवले आणि उत्तर दिले, "शाह यांची उत्तरे ही एक घाबरलेली आणि चिंताग्रस्त प्रतिक्रिया होती, ती खरी नाही. त्यांच्या कपाळावर चिंतेच्या रेषा स्पष्टपणे पाहू शकत होते, ते काय बोलायचे याचा विचार करत होते. ते आता चिडणार नाहीत; ते त्यांच्याच क्रमाने बोलतील. निवडणूक आयोगाला पूर्ण प्रतिकारशक्ती देण्याच्या त्यांच्या कल्पना प्रथम स्पष्ट करण्यास करा." तसेच, राहुल यांनी शाहांना मुक्त पत्रकार परिषदेत वोटचोरीच्या मुद्द्यावर खुली चर्चा करण्याचे आव्हान दिले.

अमित शाहांचे रोखठोक उत्तर

अमित शाह म्हणाले, "विरोधी पक्षनेत्याने निवडणूक आयोगाच्या प्रतिकारशक्तीबद्दल प्रश्न विचारला. मी त्याचे उत्तर देईन, पण इंदिरा गांधींनी स्वतःसाठी ती प्रतिकारशक्ती काढून घेतल्याबद्दल काय? इंदिरा गांधींनी तीन वरिष्ठ न्यायाधीशांना बाजूला करून चौथ्या क्रमांकाच्या न्यायाधीशाची सरन्यायाधीशपदी नियुक्ती केली. त्यातील तिसऱ्यावर मतचोरीचा आरोप होता. सोनिया गांधी या देशाच्या नागरिक होण्यापूर्वी मतदार होत्या असा आरोप करणारा खटला अलिकडेच दाखल करण्यात आला आहे. सोनिया गांधींना न्यायालयात उत्तर द्यावे लागेल. मी अद्याप निष्कर्ष काढलेला नाही. त्यांनी उत्तर दिल्यानंतर मी निष्कर्षापर्यंत पोहोचेन."

---

## लातूरमार्गे पंढरपूर-तिरूपती साप्ताहिक रेल्वे सेवा १३ डिसेंबरपासून सुरू होणार




**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**लातूर :** येत्या दि. १३ डिसेंबरपासून पंढरपूर- तिरुपती व्हाया लातूर साप्ताहिक रेल्वेसेवा सुरु होणार असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी दिली. पंढरपूरमार्गे तिरुपती रेल्वे सेवा सुरु करण्यात यावी, अशी मागच्या अनेक वर्षांपासूनची प्रवाशांची मागणी होती. रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी दि. १० ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या रेल्वे सल्लागार समितीच्या महत्वपूर्ण बैठकीत ही मागणी आग्रहाने लावून धरली होती. त्यांनी ही रेल्वेसेवा लातूरमार्गे पंढरपूर-तिरुपती सुरु करण्याच्या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न केले. त्यांच्या मागणीनुसार दक्षिण मध्य रेल्वे विभागाने गाडी क्रमांक ०७०१२ व ०७०१३ ही तिरुपती पंढरपूर-तिरुपती साप्ताहिक रेल्वे सेवा लातूरमार्गे सुरु करण्यास नुकतीच मंजुरी दिली आहे. येत्या दि. १३ डिसेंबरपासून ही गाडी सुरु होणार आहे. गाडी क्रमांक ०७०१२ ही दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजून ४० मिनिटांनी तिरुपतीहून सुटेल. ही गाडी काचीगुडा, सिकंदराबाद, बिदरमार्गे दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. १४ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजून २० मिनिटांनी लातूर स्थानकावर पोहचेल. ही गाडी सायंकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी पंढरपूर स्थानकावर पोहचेल. गाडी क्रमांक ०७०१३ ही दर रविवारी पंढरपूरहून रात्री ८ वाजता निघेल. ही गाडी मध्यरात्री १२ वाजून १० मिनिटांनी लातूर रेल्वे स्थानकावर पोहचेल तर दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी रात्री १०.३० वाजता तिरुपती स्थानकावर पोहचेल. या गाडीला एक एसी प्रथमवर्ग, एक एसी फर्स्ट कम टू टिअर, दोन एसी टू टिअर, ६ एसी श्री टिअर, ९ स्लीपर क्लास, दोन द्वितीय श्रेणी कम दिव्यांग एसएलआर असे एकूण २३ डबे असणार आहेत. ही सुविधा तूर्तास दि. १३ डिसेंबर ते दि. २८ डिसेंबर या कालावधीत सुरु असणार आहे. प्रवाशांच्या मिळणाऱ्या प्रतिसादावर या गाडीची पुढील रूपरेषा निश्चित केली जाणार असल्याचे संजय निलेगावकर यांनी सांगितले. याशिवाय या बैठकीत हरंगुळ रेल्वे स्थानकाची प्लॅटफॉर्मची उंची आणि लांबी वाढविणे, लातूर-पुणे-खडकी इंटरसिटी रेल्वे सेवा सुरु करणे आदी विषयांवरही महत्वपूर्ण चर्च झाल्याची माहिती निलेगांवकर यांनी दिली.

---

## भारतातील सर्वात श्रीमंत तिरुपती देवस्थानममध्ये लाडू घोटाळ्यानंतर 54 कोटींचा दुप्पटा घोटाळा



**तिरुपती -** तिरुपती देवस्थानममधील घोटाळ्यांची मालिका सुरुच आहे. लाडूंच्या भेसळीची चौकशी सुरू असतानाच, आणखी एक मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. मंदिरात वापरल्या जाणाऱ्या रेशमी कापडांच्या खरेदीचा हा घोटाळा आहे.

दक्षता तपासणीत असे आढळून आले की मंदिर प्रशासनाने (टीटीडी) असे कापड खरेदी केले होते जे त्यांच्या वास्तविक किमतीपेक्षा कितीतरी पट जास्त किमतीत बिल केले होते. पथकाला असे आढळून आले की बाजारात 100 रुपयांपेक्षा कमी किमतीत उपलब्ध असलेले कापड टीटीडीला 1,400 रुपयांपर्यंत पुरवले गेले होते. किंमत आणि दर्जा या दोन्हीमध्ये तफावत आढळून आली, ज्यामुळे पुढील तपास सुरू झाला.

तपासातील सर्वात धक्कादायक निष्कर्ष म्हणजे पुरवठादार, व्हीआरएस एक्सपोर्ट्स, खऱ्या रेशमाऐवजी पॉलिस्टर कापड पाठवत राहिला. प्रयोगशाळेतील चाचण्या आणि अंतर्गत तपासणीतून हे कापड अजिबात रेशमी नसल्याचे सिद्ध झाले. हे फक्त एक-दोन वर्षे नाही तर 2015 ते 2025 पर्यंत चालू राहिले. याचा अर्थ असा की दहा वर्षे, महत्त्वाच्या मंदिरातील विधींमध्ये वापरले जाणारे कापड भेसळयुक्त राहिले आणि हे कोणाच्याही लक्षात आले नाही.

या दीर्घकाळ चाललेल्या योजनेमुळे टीटीडीला 54 कोटींपेक्षा जास्त नुकसान झाल्याचे मानले जाते. हे प्रकरण इतके गंभीर होते की ऑक्टोबरच्या बोर्ड बैठकीत ते थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. एसीबी आता निविदा कशा मंजूर झाल्या, पुरवठादाराला अशा सवलती कोणी दिल्या आणि इतक्या मोठ्या प्रमाणात देखरेखीतील त्रुटी कशा घडल्या याची चौकशी करेल. या संपूर्ण घटनेनंतर, टीटीडीच्या खरेदी व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. इतक्या वर्षांपासून साधे फसवणूक देखील उघडकीस येत नसल्यास, इतक्या मोठ्या संस्थेत पारदर्शकता आणि जबाबदारी काय आहे असा प्रश्न लोक विचारत आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एका कंत्राटदाराने प्रति नग 1,389 या दराने अंदाजे 15,000 दुपट्टे पुरवले आणि ते "रेशीम दुपट्टे" असल्याचा दावा केला. तथापि, जेव्हा नमुने केंद्रीय रेशीम मंडळासह दोन प्रयोगशाळांमध्ये चाचणीसाठी पाठवले गेले तेव्हा अहवालात स्पष्टपणे दिसून आले की दुपट्टे खऱ्या रेशमाचे नव्हते तर पूर्णपणे पॉलिस्टरचे होते.

---

# तुमच्या मुलांच्या भविष्यासाठी मतदान करा, एका दिवसाच्या मेजवानीसाठी नाही - मतदारांचा ठाम संदेश

## दारू, मटन,पार्टी व खर्चा म्हणजे निवडणूक नव्हे !

## उमेदवार निर्व्यसनी, प्रामाणिक व कामे करणारा असावा..!

**“तुमच्या मुलांच्या भविष्यासाठी मतदान करा, एका दिवसाच्या मेजवानीसाठी नाही.”**

**यामुळे नांदेडमध्ये विकासाभिमुख मतदानाची हवा तयार होत असल्याचे जाणवते. नागरिकांचा कल खर्चाच्या जोरावर नव्हे तर कामाच्या जोरावर उमेदवार निवडण्याकडे झुकत आहे. निवडणुकीत पैशांच्या प्रभावाला आळा बसावा आणि खरे विकासकर्मी पुढे यावेत, अशी अपेक्षा मतदारांनी व्यक्त केली आहे. तर निवडणूक विभाग याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही याकडे गांभीर्याने घ्यावे असे मत अनेकांनी व्यक्त केले.**

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड -** नांदेड जिल्ह्यात बहुतांश नगर परिषद ची निवडणूक झाली. पण मुखेड व धर्माबाद ची निवडणूक २० डिसेंबर ला आहे. या शहरात नगर परिषद निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले असताना मतदारांमध्ये एक वेगळीच जागरूकता दिसून येत आहे. निवडणूक प्रचारात खर्चाची उधळपट्टी, दारू-मटणाच्या मेजवान्या आणि पैशांचा पाऊस याला काही ठिकाणी सुरू असलेल्या प्रोत्साहनाच्या विरोधात सर्वसामान्य नागरिकांनी आता उघडपणे आवाज उठवायला सुरुवात केली आहे.

निवडणुका जवळ आल्या की “फुकटची मेजवानी” हा काही उमेदवारांचा जणू एक प्रचारमार्ग बनला आहे. यामुळे मतदारांचे मूल्यांकन कामावर नव्हे तर पैशावर होत असल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे. अनेक वस्ती-भागांमध्ये नागरिकांनी स्पष्टपणे सांगितले आहे की,

**“एका दिवसाच्या मेजवानीपेक्षा पुढील पाच वर्षांचा विकास महत्त्वाचा आहे.”**

निवडणुकीतील वाढत्या खर्चाच्या स्पर्धेमुळे गरीब, प्रामाणिक आणि काम करण्याची तयारी असणारे उमेदवार मागे पडत असल्याची खंत मतदार व्यक्त करत आहेत. लाखो रुपयांची उधळपट्टी करण्याची क्षमता नसल्यामुळे अनेक सक्षम उमेदवार निवडणूक लढण्यापूर्वीच बाजूला होतात, ही लोकशाहीसाठी चिंतेची बाब असल्याचे मत व्यक्त होत आहे.

रस्ते, पाणी, गटारलाइन, स्वच्छता, आरोग्यसेवा, शिक्षण, तरुणांसाठी रोजगार,महिला सुरक्षा आणि सुरक्षिततेसारख्या मूलभूत प्रश्नांचा विचार न करता केवळ मेजवानी देणारे उमेदवार पुढे येतात, आणि त्याचा परिणाम शेवटी जनतेलाच सहन करावा लागतो, असे नागरिक सांगत आहेत.

मतदारांमध्ये वाढत चाललेल्या या जागरूकतेमुळे निवडणूक प्रक्रियेला नवी दिशा मिळत असल्याची चर्चा होत आहे.

## संपादकीय

### हवाई वाहतुकीचा सावळा गोंधळ

देशातील हवाई वाहतुकीच्या गोंधळाचा फटका प्रवाशांना बसला. दोन हजारांहून अधिक विमान उड्डाने रद्द झाली. एक वर्षाची मुदतवाढ देऊनही अटी पूर्ण न करणाऱ्या विमान कंपन्यांचे लाड पुरवितो कोण? वैमानिकांवर असणारा कामाचा अतिरिक्त ताण आणि विमानांच्या अपघातांची वाढती संख्या या पार्श्वभूमीवर नागरी हवाई उड्डाण महासंचालनालयाने (डीजीसीए) विमानाचे पायलट आणि केबिन क्रू यांच्या सेवेविषयी काही महत्त्वाचे बदल केले.

या बदलाच्या अंमलबजावणीला दिलेल्या कालावधीला मुतदवाढ देऊनही देशातील हवाई वाहतूक कंपन्यांनी त्याची गांभीर्याने दखल घेतली नाही आणि मुदत संपल्याने अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर देशात हवाई वाहतुकीचा मोठा गोंधळ समोर आला. देशांतर्गत विमान वाहतुकीत इंडिगो या कंपनीचा वाटा 65 टक्के आहे. कंपनीकडे उड्डाणासाठी नव्या नियमानुसार आवश्यक पायलट उपलब्ध नाहीत. या पार्श्वभूमीवर या कंपनीने सुमारे 2 हजारांहून अधिक उड्डाणे रद्द केली.

आणखी काही उड्डाणे रद्द होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे लाखो प्रवाशांना मोठ्या मनस्तापाला, अडचणींना आणि आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले. यामध्ये विमान कंपन्यांचा शासकीय आदेशांना न जुमानण्याचा हलगर्जीपणा जसा जबाबदार आहे, तसेच सरकारकडून कंपन्यांचे होणारे लाडही तितकेच कारणीभूत आहेत.

पायलटांची संख्या मर्यादित ठेवणे, त्यांच्यावर अतिरिक्त कार्यभाराचा बोजा टाकणे आणि नफ्याच्या मागे लागणे हे धोरण अवलंबिल्यामुळे मध्यंतरी हवाई वाहतुकीत मोठे आव्हान निर्माण झाले. वाहतूक विस्कळीत झाली. काही विमान अपघाताच्या चौकशींमध्ये पायलटवरील अतिरिक्त ताण जबाबदार असल्याचा निष्कर्षही पुढे आला होता. जागतिक स्तरावर पायलट थकव्यामुळे मानवी चुकांच्या सुमारे 20 टक्के प्राणघातक अपघात होतात, असेही एक संशोधन पुढे आले.

यामुळेच 'डीजीसीए'ने जानेवारी 2024 मध्ये पायलट आणि केबिन क्रू यांच्यासाठी 'विमानसेवा कालावधी मर्यादा' (एफडीटीएल) ही नियमावली निश्चित केली. यामध्ये सलग 48 तासांचा साप्ताहिक विश्रांती कालावधी बंधनकारक केला. रात्रीच्या ड्युटीवर मर्यादा आल्या. रात्रीच्या उड्डाणाची व्याख्या पाचऐवजी मध्यरात्री ते सकाळी 6 अशी केली. प्री व पोस्ट फ्लाईट जबाबदाऱ्या धरून एका तासापेक्षा जास्त अतिरिक्त कामाची परवानगी नाकारली. तसेच दीर्घ मार्गावर सेवेसाठी अतिरिक्त 24 तासांची विश्रांती बंधनकारक केली. ही नियमावली जून 2024 मध्ये अंमलात येणार होती. तथापि, विमान वाहतूक कंपन्यांच्या विनंतीनुसार 'डीजीसीए'ने ही अंमलबजावणी जुलै व नोव्हेंबर 2025 अशी दोन टप्प्यांत सुरू करण्यास अनुमती दिली. यामुळे विमान कंपन्यांना तब्बल एक वर्षाचा कालावधी उपलब्ध झाला होता.

तथापि, खर्चात काटकसर आणि अतिरिक्त नफ्याच्या मागे लागलेल्या कंपन्यांनी त्याकडे साफ दुर्लक्ष केले आणि आता अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर उड्डाणे रद्द करून प्रवाशांना वेठीस धरणे सुरू झाले आहे. काही विमान कंपन्यांनी तिकिटाचे दर दसपटीहून अधिक वाढवत आपले खिसे गरम केले. त्यानंतर पंतप्रधान कार्यालयाने विमान कंपन्यांच्या नफेखोरीला लगाम घातला. विमान वाहतूकमंत्र्यांनी सखोल चौकशीचे आदेश देत कोणाचीही गय केली जाणार नाही, असा इशारा दिला. तथापि, विमान कंपन्यांची ही मग्रुरी आणीबाणीची स्थिती निर्माण करू शकते.

इंडिगोने विमाने रद्द केल्यामुळे प्रवाशांचे किती अतोनात हाल झाले, त्याचे नमुनेदार उदाहरण केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या मतदारसंघातील पुणे विमानतळावर पाहायला मिळाले. गुरुवारी उड्डाणे रद्द झाल्यामुळे विमानतळाला ग्रामीण भागातील एस.टी. स्टँडसारखे स्वरूप आले होते. प्रथम दिल्लीला जाणारे विमान तीन तास उशिरा असल्याचे सांगण्यात आले आणि नंतर ते रद्द झाल्याची घोषणा करण्यात आली. प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांच्या खचाखच गर्दीने विमानतळ फुलून गेले. लोक मांड्या घालून जागा मिळेल तिथे पाय पसरून बसले. बाचाबाचीही झाली. अनेकांच्या नोकरीविषयक मुलाखती, कनेक्टिंग फ्लाईट चुकल्या. रिटर्न तिकीट वाया गेले. याचा फायदा अन्य कंपन्यांनी उचलून तिकीट दर वाढवून बक्कळ नफा कमविला.

केंद्र सरकारने गेल्या काही वर्षांत हवाई वाहतुकीच्या पायाभूत सुविधांमध्ये आमूलाग्र बदल केले. देशात 2014 ते 2025 या कालावधीत विमानतळांची संख्या 74 वरून 160 वर नेली. 'उडान'सारख्या सरकारी अनुदानाच्या योजनांमुळे याच कालावधीत हवाई प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या 11 कोटींवरून 25 कोटींवर गेली. शिवाय, प्रतिवर्षी यामध्ये 10 ते 12 टक्क्यांची भर पडते. हवाई वाहतुकीची ही क्षमता लक्षात घेऊन भारतातील हवाई कंपन्यांनी विमानांच्या मोठ्या ऑर्डर्स विदेशी कंपन्यांना दिल्या आहेत.

यामध्ये इंडिगो एक हजारपेक्षा अधिक विमाने आपल्या ताफ्यात (फ्लिट) दाखल करणार आहे. एअर इंडियाची 500 विमाने नव्याने दाखल होत आहेत आणि इतर लहान कंपन्यांनीही आपली मोठी मागणी नोंदविली आहे. या विमानांची संख्या लक्षात घेता आगामी काळात सुमारे 20 हजारांहून अधिक प्रशिक्षित पायलटची गरज निर्माण होणार आहे. या प्रशिक्षित वैमानिकांच्या उपलब्धतेसाठी कोणते नियोजन आहे, याचीही माहिती जाहीर होणे आवश्यक आहे. कारण, सध्या प्रवाशांना महागड्या दराने तिकिटे घेऊन विमान कंपन्यांच्या तालावर नाचावे लागते आहे. भारतामध्ये विमान प्रवाशांच्या संख्येमध्ये लक्षणीय भर टाकणारे नागरिक यांचे जीव काही किड्या-मुंग्यांसारखे नाहीत. त्यांच्या सुरक्षित प्रवासाची हमी विमान कंपन्यांनी दिली पाहिजे आणि त्यावर 'डीजीसीए'चे कडक नियंत्रण असणे आवश्यक आहे.

दुर्दैवाने 'डीजीसीए'ने अलीकडे विमान प्रशिक्षण अकादमीच्या केलेल्या मूल्यमापनाचे चित्र धक्कादायक आहे. 'डीजीसीए'ने प्रथमच वैमानिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचे रँकिंग जाहीर केले. यात एकाही संस्थेला ए किंवा ए प्लस श्रेणी मिळाली नाही. बहुतेक कंपन्या बी आणि सी श्रेणीत आहेत.

यामुळे उद्योगात उच्च गुणवत्तेचे पायलट तयार होण्याचा वेग मर्यादित होऊ शकतो. इंडिगोची सद्यस्थिती ही केवळ देशातील एका एअरलाईन्सची समस्या नाही. ती संपूर्ण विमान वाहतूक क्षेत्रातील मानव संसाधन नियोजन, प्रशिक्षण, गुणवत्ता आणि उपलब्धता याकडे लक्ष वेधते. एकूणच या गोंधळाची 'डीजीसीए' किती गांभीर्याने दखल घेते, कारवाई किती निरपेक्ष होते आणि शिस्तीचा धाक निर्माण करण्यात किती यशस्वी होते, यावर देशातील विमान प्रवासाचे भवितव्य अवलंबून आहे. केंद्र सरकार, 'डीजीसीए' यांनी गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. अन्यथा विमानतळे आहेत, विमाने आहेत; पण पायलटअभावी ती उडू शकत नाहीत, असे दुर्दैवी चित्र निर्माण होऊ शकते.

# उष्णतेने मरायचे की जगायचे? COP30 ठरवणार



हवामान बदल हा 21 व्या शतकातील मानवी जीवन, आरोग्य, उपजीविका आणि एकूणच कल्याणासाठी सर्वात मोठा धोका बनला आहे. जगभरातील हवामानातील तीव्र बदल आणि अविश्वसनीय वातावरणीय नमुने हवामानाशी संबंधित आजारांची संख्या वाढवत आहेत आणि उष्णतेमुळे होणाऱ्या मृत्यूंचाही वेग वाढवत आहेत. दुष्काळामुळे अन्न व पाणी सुरक्षिततेवर गंभीर परिणाम होत आहेत, पूरामुळे संसर्गजन्य रोगांचा प्रसार वाढतो आहे, तर भीषण वादळे आरोग्य व्यवस्थांवर प्रचंड ताण आणत आहेत. या सर्व घटनांनी एक मोठी उणीव स्पष्ट केली आहे, हवामान बदलामुळे वाढणाऱ्या आरोग्य संकटांना तोंड देण्यासाठी आवश्यक तेवढ्या गतीने अनुकूलनाची प्रक्रिया पुढे सरकलेली नाही.

2015 च्या पॅरिस करारानंतर तयार झालेल्या पहिल्या ग्लोबल स्टॉकटेकनेही हे वास्तव अधोरेखित केले. अहवालात स्पष्ट नमूद आहे की हवामान बदलाचे दुष्परिणाम जगातील प्रत्येक प्रदेशात जाणवू लागले आहेत, पण सध्याचे अनुकूलन प्रयत्न विस्कळीत, अपुरे आणि सर्वत्र समान रीतीने अंमलात आणले गेलेले नाहीत. विशेषतः आरोग्य क्षेत्रात अनुकूलनाची गती अत्यंत कमी आहे; सुमारे 3.6 अब्ज लोक हवामान जोखमींसाठी अत्यंत असुरक्षित आहेत, आणि अनेक देशांतील आरोग्य व्यवस्था, हा जो ताण पडतोय याला सामोरे जाण्यासाठी पुरेशी सक्षम नाही. 2030 पर्यंत विकासशील देशांना हवामान अनुकूलनासाठी दरवर्षी 215 ते 387 अब्ज अमेरिकन डॉलर्सची गरज भासेल, मात्र प्रत्यक्षात मिळणारा निधी याच्या तुलनेत खूपच कमी आहे. या पार्श्वभूमीवर, दुबईत झालेला COP28 हा हवामान आणि आरोग्य यांच्या नातेसंबंधातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. संयुक्त राष्ट्रांच्या हवामान चर्चेत प्रथमच आरोग्याला केंद्रीय स्थान देण्यात आले. या परिषदेत 'हेल्थ डे' साजरा करण्यात आला, हवामान-आरोग्य विषयक उच्चस्तरीय मंत्री परिषद झाली, आणि 143 देशांनी हवामान आणि आरोग्य यावर पहिल्यांदाच ऐतिहासिक घोषणापत्रावर स्वाक्षऱ्या केल्या. याशिवाय, COP28 मध्ये स्वीकारलेल्या संयुक्त अरब अमिरातीच्या (UAE) ग्लोबल फ्रेमवर्क फॉर क्लायमेट रिसिलियन्सने 2030 पर्यंत हवामान जोखीम मूल्यांकन, नियोजन आणि अंमलबजावणी यांसाठी ठोस उद्दिष्टे निश्चित केली आहेत, ज्यात हवामान धक्क्यांपासून आरोग्य व्यवस्थांना सक्षम आणि टिकाऊ बनविण्याच्या लक्ष्याचाही समावेश आहे. COP30 अशा वेळी होत आहे, जेव्हा 2025 पर्यंत अनुकूलनासाठी लागणारा वित्तीय निधी दुप्पट करण्याचे आधीचे आश्वासन पूर्ण होण्याची मुदत संपत आहे, आणि ते लक्ष्य साध्य न होण्याची शक्यता दिसत आहे. 2023 पर्यंत विकासशील देशांसाठी ठरवलेल्या जवळपास US$40 अब्ज निधीपैकी केवळ US$26 अब्जच वितरित झाले आहेत, हे त्या अपुऱ्या प्रगतीचे प्रतीक आहे. ब्राझीलमधील बेलेम येथे होणारा COP30 हा हवामान आणि आरोग्य या परस्परसंबंधित अजेंडाच्या दृष्टीने निर्णायक क्षण ठरणार आहे. ग्लोबल स्टॉकटेकच्या निष्कर्षांनी स्पष्ट केले आहे की आरोग्याशी संबंधित अनुकूलन प्रयत्न हवामान कृतीच्या उद्दिष्टांपेक्षा बरेच मागे आहेत. त्यामुळे या परिषदेत हे वास्तव केवळ मान्य करून थांबता कामा नये; त्याचे ठोस परिणामही दिसले पाहिजेत. यासाठी पॅरिस कराराच्या कलम 7 अंतर्गत असलेल्या जागतिक अनुकूलन लक्ष्यामध्ये (GGA) आरोग्याशी निगडित मोजता येण्याजोगे निर्देशांक समाविष्ट करणे, तसेच कलम 13 अंतर्गत त्या परिणामांचा पारदर्शक अहवाल देणे आवश्यक ठरेल. त्याचबरोबर नुकताच आकार घेत असलेल्या 'नुकसान आणि हानी' (Loss and Damage) आराखड्याला सार्वजनिक आरोग्य व्यवस्थांच्या वास्तव परिस्थितीशी जोडणेही तितकेच महत्त्वाचे ठरेल.

या आव्हानाचा व्याप्ती केवळ ओळखीच्या आरोग्यधोक्यांपुरती मर्यादित राहिलेली नाही. यात जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व, औषधांना प्रतिसाद न देणाऱ्या जीवाणूंचा धोका (AMR), सूक्ष्म-प्लास्टिकमुळे वाढणारे प्रदूषण, आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) डेटा सेंटर्सची प्रचंड जल-आवश्यकता यांसारख्या नवीन संकटांचाही समावेश आहे. विशेषतः AI डेटा सेंटर्सचा विस्तार ज्या भूजलस्त्रोतांवर होत आहे, ते अनेक प्रदेशांमध्ये आधीच दुष्काळ आणि पाण्याच्या कमतरतेशी झुंज देत आहेत. त्यामुळे हे नवे धोके हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य सुरक्षेसाठी आणखी गुंतागुंतीचे आव्हान निर्माण करत आहेत.

आरोग्य अनुकूलनातील दरी

आरोग्य अनुकूलनातील कमतरता भरून काढण्यासाठी COP30 हा एक निर्णायक टप्पा ठरणार आहे. या परिषदेत जागतिक अनुकूलन उद्दिष्टाचा (GGA) व्यापक आराखडा स्वीकृत होण्याची अपेक्षा आहे, ज्यामध्ये स्पष्ट उद्दिष्टे आणि मोजण्याजोगे निर्देशांक समाविष्ट असतील. अनेक वर्षांच्या चर्चेनंतर, पक्षांनी पाणी, अन्न, परिसंस्था आणि आरोग्य यांसारख्या सात मुख्य क्षेत्रांवर सहमती दर्शवली आहे आणि प्रगती मोजण्यासाठी जवळपास 100 निर्देशांकांचा मसुदा तयार केला आहे. COP30 मध्ये हा आराखडा अंतिम झाल्यास, प्रत्येक स्तरावरील अनुकूलन आराखड्यांमध्ये आरोग्याचा समावेश करण्यासाठी एक स्पष्ट दिशा उपलब्ध होईल. उदाहरणार्थ, प्रस्तावित आरोग्य निर्देशांकांपैकी एक उष्णतेशी संबंधित कामगार जखमा आणि मृत्यूंच्या वार्षिक प्रमाणातील बदल मोजण्यावर आधारित आहे. हा एक ठोस आणि प्रत्यक्ष मोजता येणारा घटक आहे, जो देशांना वाढत्या तापमानामुळे होणारे मानवी नुकसान कमी करण्यासाठी प्रेरित करू शकतो.

या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अतिरिक्त मदतीची आवश्यकता असेल. हवामान वित्तपुरवठ्यात अनुकूलनाला शमनाच्या तुलनेत सातत्याने कमी प्राधान्य मिळाले आहे. सध्या उपलब्ध सार्वजनिक हवामान निधीपैकी केवळ एक-तृतीयांश रक्कम अनुकूलनासाठी वापरली जाते, आणि 2023 मध्ये एकूण हवामान वित्तीय निधीपैकी केवळ 3 टक्के रक्कमच प्रत्यक्ष अनुकूलन प्रकल्पांपर्यंत पोहोचली. COP30 अगदी त्या वेळी होत आहे, जेव्हा 2025 पर्यंत अनुकूलनासाठीचा निधी दुप्पट करण्याची आधीची वचनबद्धता पूर्ण होण्याची वेळ आली आहे. परंतु या लक्ष्याच्या पूर्ततेबाबत गंभीर शंका उपस्थित झाल्या आहेत. 2023 पर्यंत विकासशील देशांसाठी निश्चित करण्यात आलेल्या जवळपास US$40 अब्ज निधीपैकी फक्त US$26 अब्जच वास्तविक वितरित झाला आहे.

आरोग्यावर होणारे परिणाम हे अनुकूलनाच्या यशाचे सर्वात स्पष्ट आणि सहज समजणारे मोजमाप ठरतात. जर COP30 मध्ये पक्षांनी GGA अंतर्गत सामायिक आरोग्य निर्देशांकांवर एकमत साधले, तर ते आपल्या राष्ट्रीय अहवालांमध्ये आणि ग्लोबल स्टॉकटेकमधील सादरीकरणांमध्ये सहजपणे समाविष्ट करता येतील.

सध्या बहुतेक अहवाल उत्सर्जन कमी करण्यावर भर देतात, परंतु अनुकूलन आणि प्रतिकारक्षमता मोजण्यासाठी लागणारे निर्देशांक अद्याप पुरेशा प्रमाणात विकसित नाहीत. इथेच आरोग्याचे निर्देशांक मोठा बदल घडवू शकतात. आरोग्याशी संबंधित परिणाम हे हवामान अनुकूलनाच्या प्रत्यक्ष प्रभावाचे थेट चित्र दाखवतात. जर हे निर्देशांक स्वीकारले गेले, तर देशांना उष्णतेमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या वाढत्या घटनांची स्थिती, हवामानाला तग धरणाऱ्या रुग्णालयांची संख्या, किंवा हवामान-संवेदनशील आजारांच्या घटनांतील बदल यांसारखी माहिती नियमितपणे सादर करावी लागेल. अशा प्रकारची माहिती हवामान कृतीचे मूल्यांकन केवळ तांत्रिक संख्यांपुरते मर्यादित न ठेवता त्याला मानवी स्वरूप देईल. यामुळे वाढत्या तापमानामुळे होणारे मृत्यू, किंवा नवीन प्रदेशांत पुन्हा उद्भवणाऱ्या मलेरियासारख्या आजारांच्या वाढीवर सरकारांनी ठोस पावले उचलणे अपरिहार्य होईल.

ज्या गोष्टी मोजल्या जातात त्या महत्त्वाच्या ठरतात ज्या गोष्टी मोजल्या जातात त्यांनाच खरे महत्त्व मिळते. परिणामांव्यतिरिक्त, पक्ष आरोग्य क्षेत्राच्या अनुकूलन क्षमतेचे मापन करणारे निर्देशांकही ठरवू शकतात. उदाहरणार्थ, हवामान बदलाचा परिणाम सहन करू शकतील अशा पायाभूत सुविधांनी सज्ज असलेल्या आरोग्य केंद्रांची टक्केवारी, जसे की पूरप्रतिबंधक बांधकामे, उष्णतेच्या लाटा आल्यास वापरण्याजोगी बॅकअप वीजयोजना, किंवा शाश्वत शीतकरण प्रणाली, हा एक महत्त्वाचा निर्देशक होऊ शकतो.

महत्त्वाचे म्हणजे, स्वीकारलेले कोणतेही निर्देशांक पारदर्शकपणे नोंदवले गेले पाहिजेत. 2024 पासून लागू झालेल्या सुधारित पारदर्शकता चौकटनुसार, देशांनी द्वैवार्षिक पारदर्शकता अहवाल (BTRs) देणे अपेक्षित आहे, ज्यामध्ये अनुकूलनविषयक माहिती आवश्यक आहे. जर COP30 पक्षांना स्पष्टपणे "सर्वात महत्त्वाची गोष्ट, मानवांचे आरोग्य ते मोजा" असे मार्गदर्शन करून आपल्या राष्ट्रीय अहवालांमध्ये आरोग्यविषयक निर्देशांकांचा समावेश करण्यास प्रवृत्त करते, तर आपल्या सामूहिक हवामान प्रगतीचे मूल्यांकन अधिक अर्थपूर्ण होईल. अशा पद्धतीने 2028 मधील दुसरा जागतिक स्टॉकटेक केवळ किती उत्सर्जन कमी झाले यापेक्षा हवामान कृतीमुळे (किंवा निष्क्रियतेमुळे) किती जणांचे प्राण वाचले किंवा किती जीवितहानी झाली याचे उत्तर देऊ शकेल.

हवामान भविष्य आणि पुढील जोखमींची लाट

भविष्यातील हवामान आणि उदयोन्मुख जोखमींकडे पाहिले असता, हवामान आणि आरोग्य यांचे परस्परसंबंध प्रत्यक्षात आणण्यासाठी विविध क्षेत्रांमध्ये सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज भासते. हवामान संकट आणि जागतिक आरोग्य संकट हे एकमेकांशी गुंतलेले असून, त्यांचे परिणाम साखळीप्रमाणे वाढत जातात. म्हणून धोरणेही तुकड्यामध्ये नव्हे, तर व्यापक पातळीवर तयार झाली पाहिजेत. तापमानवाढ आणि पावसातील बदल केवळ रोगांचा प्रसार वाढवतात असे नाही, तर प्रतिजैविक प्रतिकारशक्ती (AMR) देखील वाढवतात. पूर आल्यावर सांडपाणी लोकवस्तीमध्ये मिसळल्यास प्रतिजैविक-प्रतिरोधक जंतू पसरू शकतात, आणि त्याच वेळी संसर्ग वाढल्याने प्रतिजैविकांचा जास्त वापर केला जातो, ज्यामुळे प्रतिकारशक्ती आणखी मजबूत होते.

COP28 च्या शेवटच्या दस्तऐवजात इतिहासात पहिल्यांदाच जीवाश्म इंधनांपासून दूर जाण्याची गरज नमूद झाली. यामुळे कोळसा, तेल आणि वायू यांचा निर्बंधांशिवाय वापर करणाऱ्या युगाचा शेवट जवळ आल्याचे संकेत मिळतात. हे विधान अत्यंत सावधपणे लिहिले असले तरी त्यात काही महत्त्वाच्या उणिवा आहेत आणि COP30 मध्ये या मुद्द्याचा पुन्हा सखोल विचार करणे आवश्यक ठरेल. जीवाश्म इंधनांची टप्प्याटप्प्याने समाप्ती हा आता चर्चेचा मुख्य विषय असणार आहे, कारण हे इंधन केवळ हवामान बदलाचे मोठे कारण नाहीत, तर गंभीर आरोग्य समस्यांचेही मूळ आहेत. आरोग्याच्या दृष्टीकोनातून पहाता, जीवाश्म इंधनांचा वापर कमी झाला तर प्लास्टिक उत्पादनही घटेल आणि तेल उद्योगातून बाहेर पडणारे विषारी रसायनेही कमी होतील. आज 99 टक्क्यांपेक्षा जास्त प्लास्टिक जीवाश्म इंधनांपासून तयार होते आणि त्याचे उत्पादन, वापर आणि जाळलेला कचरा असे मिळून सगळे हरितगृह वायू वाढवतात. या प्रक्रियेने मायक्रोप्लास्टिक प्रदूषणही वाढते, जे हवा, पाणी आणि मातीमध्ये पसरते आणि फुफ्फुसांचे आजार, हार्मोनलच्या तक्रारी अशा नवीन आरोग्यधोक्यांना आमंत्रण देते.

याशिवाय, काही उदयोन्मुख आव्हानांवरही लक्ष देणे गरजेचे आहे. डिजिटायझेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांचा वाढता वापर फायदेशीर असला तरी, या तंत्रज्ञानासाठी लागणारी मोठी डेटा केंद्रे प्रचंड ऊर्जा आणि पाणी वापरतात. ही केंद्रे अनेकदा पाण्याच्या टंचाई असलेल्या भागांमध्ये उभारली जातात आणि दररोज लाखो गॅलन पाणी वापरतात. जे हजारो लोकांच्या दैनंदिन गरजांइतके आहे. त्यामुळे हवामान उपाययोजना किंवा नवीन औद्योगिक प्रगती या आरोग्यासाठी नवे संकट ठरू नयेत, हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे आहे.


आपला मुख्य संदेश स्पष्ट आहे, हवामान धोरणे आणि आरोग्य धोरणे या दोन्हींची दिशा एकसंध असली पाहिजे. हवामान बदलाकडे फक्त कार्बन उत्सर्जन किंवा तापमानवाढ म्हणून बघून चालणार नाही; त्याचा मनुष्यांच्या आयुष्यावर होणारा परिणामही मोजला पाहिजे. देशांनी अनुकूलन, पारदर्शकता आणि निधी यांना आरोग्याशी जोडून पाहिले, तर हवामान कृतीचा अर्थ केवळ ग्राफ आणि आकड्यांपुरता न राहता मानवी सन्मान, सुरक्षितता आणि जीवनमान सुधारण्याच्या दिशेने जाईल. जसे म्हटले जाते, "जे मोजले जाते, तेच सुधारले जाते." योग्य गोष्टी मोजल्या आणि त्यावर काम झाले, तर COP30 मानवजातीला हवामान संकटाच्या काळात फक्त तग धरण्यास नाही, तर प्रगती करण्यास मदत करू शकेल.


# जपानमध्ये पुन्हा 'प्रलय'; ७.६ रिश्टरचा हाहाकार

## इशिकावा किनारपट्टीवर त्सुनामीच्या लाटांची भीती, भूकंपाने रस्ते खचले









जपानची भूमी पुन्हा एकदा भूकंपाच्या जोरदार धक्क्याने हादरली आहे. जपानच्या उत्तरेकडील किनाऱ्यापासून दूर समुद्रात सोमवारी शक्तिशाली भूकंप झाला, ज्यामुळे अनेक शहरांमध्ये तीव्र झटके जाणवले.

जपान हवामान विज्ञान एजन्सीने या भूकंपाची तीव्रता ७.६ रिश्टर स्केल इतकी नोंदवली आहे. भूकंपानंतर जपानच्या ईशान्येकडील किनारपट्टीसाठी त्सुनामीची तातडीची धोक्याची सूचना जारी करण्यात आली आहे.

भूकंपाचा केंद्रबिंदू समुद्राच्या आत असल्यामुळे त्सुनामीचा धोका लक्षणीय वाढला आहे. जेएमएने दिलेल्या माहितीनुसार, त्सुनामीच्या लाटांची उंची १० फुटांपर्यंत वाढू शकते. इशिकावा प्रांत आणि त्याच्या आसपासच्या भागांना त्सुनामीचा सर्वाधिक धोका असल्याचे हवामान विज्ञान एजन्सीने स्पष्ट केले आहे.

काही वर्षांपूर्वी याच भागात मोठी त्सुनामी आल्यामुळे प्रशासनाने नागरिकांना त्वरित सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन केले आहे. या भूकंपाचे धक्के इतके तीव्र होते की, त्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले आहेत.

भूकंपाच्या जोरदार धक्क्यांमुळे जपानमधील रस्त्यांचा काही भाग पूर्णपणे तुटून आणि नुकसाग्रस्त झालेला दिसत आहे. दुकानांमध्ये आणि घरांमध्ये ठेवलेले टीव्ही, पंखे आणि इतर वस्तू वेगाने हलू लागल्या आणि खाली पडल्या.

अनेक दुकानांची अवस्था खूपच वाईट झाली असून, भिंती आणि सामान तुटलेले दिसत आहे. अनेक लोक त्यांच्या घरातील सामान वाचवण्याचा प्रयत्न करताना कॅमेरात कैद झाले आहेत.

प्रशासनाने नागरिकांना किनारी भागापासून दूर राहण्याचे आणि सुरक्षित उंच ठिकाणी आश्रय घेण्याचे निर्देश दिले आहेत. या भूकंपाने झालेल्या नुकसानीचा आणि संभाव्य त्सुनामीच्या धोक्याचा अंदाज घेत जपानमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# “माझा विजय म्हणजे गोर-गरीब आणि सर्व सामान्य जनतेचा विजय” असेल – दशरथ रोडगे



**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**मुखेड -** मुखेड नगर परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग १० (ब) चे अपक्ष उमेदवार दशरथ रोडगे यांनी आपल्या प्रचारादरम्यान एक प्रभावी संदेश देत म्हटले की,“माझा विजय म्हणजे गोर-गरीबांचा आणि सर्व सामान्य जनतेचा विजय असेल.”

प्रभागातील नागरिकांशी संवाद साधताना रोडगे यांनी सांगितले की, त्यांनी नेहमीच सामान्य माणसाच्या समस्यांना प्राधान्य दिले आहे. नगरातील गोर-गरीब, कष्टकरी, शेतमजूर, नोकरदार, छोटे उद्योजक आणि सर्वसामान्य कुटुंबांची गरज, अडचण आणि अपेक्षा समजून घेत काम करण्याचा आपला प्रयत्न असतो, असे त्यांनी जाहीर केले.

रोडगे यांनी स्पष्ट केले की, विकासासाठी मोठ्या घोषणा किंवा दारू-मटण पार्ट्या नकोत; तर प्रत्यक्षात नागरिकांच्या घराघरात सुविधा पोहोचवणारे काम आवश्यक आहे.

रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, गटार लाइन, स्ट्रीट लाइट, आरोग्य सुविधा आणि तरुणांसाठी संधी, या सर्व मूलभूत गरजांवर ठोस काम करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

मतदारांच्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना रोडगे म्हणाले की, “माझ्यावर आशीर्वाद द्या, कारण हा विजय माझा नसून तुमचा असेल; गोर-गरीब, सर्वसामान्य जनतेच्या सन्मानाचा व अधिकारांचा विजय असेल.

प्रभागातील नागरिकांनीही रोडगे यांच्याकडून विकासाभिमुख कामांची अपेक्षा व्यक्त केली आहे. प्रचार दौऱ्यादरम्यान महिलांपासून तरुणांपर्यंत सर्वच स्तरातून रोडगे यांना मतदारांचे बळ मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

**रोडगे यांनी शेवटी मतदारांना आवाहन केले की, “मतदानाचा हक्क वापरा, तुमचा विश्वास माझी ताकद आहे. तुमच्यासाठीच काम करीन.” तुमच्या येणाऱ्या पिढीसाठी मतदान करा. मुखेड नगरपरिषद निवडणुकीत रोडगे यांच्या उमेदवारीला वेग मिळाल्याने प्रभागात उत्सुकता वाढली आहे. अपक्ष उमेदवार असले तरी प्रभाग क्रमांक १० (ब ) मध्ये त्यांच्या प्रचारासमोर पक्षाचे उमेदवार फिके पडत असल्याची मतदार करीत आहेत.**

## नारायण शेटे यांचे निधन

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**लोहा, (प्रतिनिधी)** जुना लोहा शहरातील प्रतिष्ठित जेष्ठ नागरिक नारायण देवराव शेटे वय (७०) वर्षे यांचे दि.८ डिसेंबर रोजी सकाळी ७.०० वाजता निधन झाले.



त्यांच्यावर नांदेड येथील नामांकित हॉस्पिटल मध्ये त्यांच्यावर उपचार सुरू असताना उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली त्यांच्या पार्थिवावर शेतात दुपारी साडेचार वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी माजी आमदार रोहिदास चव्हाण, काँग्रेस नेते संजय भोसीकर गंगाप्रसाद येनावार, बालाजी पांडागळे, विश्वांभर मंगनाळे, माजी नगराध्यक्ष गजानन सूर्यवंशी, शरद पवार, केशवराव मुकदम, करीमभाई शेख, चंद्रसेन पाटील सोनू संगेवार, दत्ता वाले, हरिभाऊ चव्हाण, पंचशील कांबळे यांसह शहर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातू असा मोठा परिवार आहे.. काँग्रेस पक्षाचे युवा मा. शहराध्यक्ष पांडूरंगभाऊ शेटे यांचे ते वडील होते

## हदगांव शहरातील तामसा रोडवर उघडी विद्युत रोहित्रे - नागरिकांच्या जीवाला धोका

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**





**हदगांव –** प्रतिनिधी शहरातील तामसा रोड वर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते नवी आबादी पर्यंत पाच विद्युत रोहितत्रे आहेत त्यामध्ये तहसील कार्यालयाच्या समोर विद्युत रोहितत्रे उघडे असल्यामुळे त्या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकांची वाहनाची वर्दळ असते त्याचबरोबर नववी आबादी समशानभूमी पाशी सुद्धा विद्युत रोहित उघडे आहेत रमाई चौक. जय भीम नगर. बुद्धभूमी वसाहत मुलीचे वस्तीग्रह रोडवर व परिसरात अनेक ठिकाणी उघडी व खराब झालेली विद्युत रोहितत्रे दिसत असल्याने नागरिकांच्या जीविताला मोठा धोका निर्माण झाला आहे. मुख्य रस्त्यालगत विद्युत रोहितत्रे उघडे असल्याने ये -जा करणारी पादचारी, वाहनचालक तसेच परिसरातील नागरिकांमध्ये व कला वाणिज्य महाविद्यालय समाज कल्याण शासकीय मुलींचे वस्तीगृहात असलेल्या करणाऱ्या विद्यार्थी मध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

काही ठिकाणी ठिणग्या उडल्याचे प्रत्यक्षदर्शींनी नागरिकांनी सांगितले. तामसा रोड परिसरात सकाळ–संध्याकाळ मोठी वर्दळ व मोकाट जनावरे सुद्धा असल्याने अपघाताची शक्यता नाकारता येत नाही

दररोज मुलांना शाळेत नेताना भीती वाटते. या उघड्या रोहितत्रेची अवस्था कधीही गंभीर अपघात घडवू शकते,” असे एका स्थानिक रहिवाशाने सांगितले. नागरिकांनी विद्युत विभागाकडे अनेक वेळा तक्रारी नोंदवल्या असूनही अद्याप दुरुस्तीचे काम सुरू झालेले नाही. तातडीने उघडे रोहितत्रे बंद करण्यात यावे अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# “विम्याचं आश्वासन कुठे हरवलं हो साहेब ?”

## नागपूरच्या अधिवेशनात पिकविम्याची लक्षवेधी नांदेडच्या लोकप्रतिनिधींनी मांडून शेतकऱ्यांना न्याय देतील का ?

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**दत्ता गोजेगावकर**
**नांदेड / प्रतिनिधी**

हिवाळी अधिवेशनाच्या तोंडावर राज्यभरातील शेतकऱ्यांच्या मनात एकच



ठिणगी पेटली आहे. मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेला प्रति हेक्टर १७,००० रुपयांचा पीक विमा साहेब कुठे गायब झाला असा प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात उपस्थित होत आहे ?

गेल्या दोन वर्षांपासून शेतकरी अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, बाजारभावाची घसरगुंडी... अशा अनेक संकटात अडकलेल्या शेतकऱ्यांना सरकारच्या निर्णयांची वाट बघून बघून वैताग आला आहे.

“वेळ आली की गोड बोलायचं, पण पैसे देताना मौन का ?” हिवाळी अधिवेशनात पीकविम्याचा मुद्दा जोरदार तापेल अशी चिन्हे दिसत नाहीत. नांदेड जिल्ह्यातील एका तर लोकप्रतिनिधींनी पिकं विम्याची लक्षवेधी घेऊन सरकारचे लक्ष वेधून थेट जाब विचारून शेतकऱ्यांना न्याय देतील का ? असा प्रश्न नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांतुन उपस्थित केला जात आहे.

### गावागावांतून आवाज उठतोय

**“शब्द नको, पैसा द्या!”**
**“१७,००० हजार चं आश्वासन हवेत का गाडीत?”**
**शेतकऱ्यांच्या डोळ्यात आशेचं पाणी नाही... आता हिशोब मागायची वेळ आली आहे. अधिवेशनात हा मुद्दा पेटला, तर सरकारला उत्तर द्यावंच लागणार— असा जनतेचा कडवट सूर आहे.**

### झोपेत शासन शेतकरी संकटात

**महाराष्ट्रातील शेतकरी मोठ्या संकटाला सामोरे जात असताना शासन मात्र पूर्णपणे उदासीन दिसत आहे, ना सर्व शेतकऱ्यांना दुष्काळ मदत मिळालेली आहे ना पीक विमा मिळालेला आहे .. निवडणुकीच्या अगोदर दिलेल कर्जमाफी च आश्वासन पूर्ण झालेलं नाही फक्त तारीख पे तारीख, पीक विमा मदत वितरणात होणारा विलंब तातडीने दूर करावा.व शासनाने बंद केलेले ट्रिगर लागू करा.**
**माधव पाटील होणवडजकर,**
**शेतकरी पुत्र**




**सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले. शासनाने मोठ्या वल्गना करत वाढीव मदतीची घोषणा केली तरी परंतु हजारो शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची मदत आजतागायत पोहोचली नाही.**
**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी 17000 रुपयाचा पिक विमा परतावा देऊ अशी घोषणा केली. मुळात 80 ते 100 टक्के नुकसानी झालेल्या जिल्ह्यामध्ये हेक्टरी 17000 रुपयांच्या पीकविमा परताव्याचा जावई शोध मुख्यमंत्र्यांनी कसा लावला हे न उघडलेलेच कोड आहे. अन् ही घोषणा करूनही दोन महिने उलटून गेले तरीही शेतकऱ्यांना पीक विम्याचा एक दमडीही मिळाला नाही. एवढी गंभीर परिस्थिती असतानाही जिल्ह्यातला एकही लोकप्रतिनिधी हिवाळी अधिवेशनात याबाबत तोंड उघडायला तयार नाही. शेतकऱ्यांच्या हक्काचा पिकविमा व दुष्काळ निधी रक्कम तात्काळ वितरित करावा; अन्यथा शासनाला शेतकऱ्यांच्या रोषाला तोंड द्यावे लागेल.**
**- कैलास येसगे कावळगावकर**
**(शेतकरी नेते तथा जिल्हा प्रवक्ते-काँग्रेस पार्टी, नांदेड)**

हे वृत्तपत्र, मालक, प्रकाशक व संपादक **डोईजड ज्ञानेश्वर बालाजीराव** यांनी मुद्रक **सतिश विजय सोनवणे** यांच्या **यश प्रिंटर्स अँड पब्लिकेशन शिवाजी नगर नांदेड ता.जि. नांदेड (महाराष्ट्र) – ४३१६०२** येथे प्रकाशित केले.
E-MAIL - shramiklokrajya@gmail.com

**Daily Shramik Lokrajya,** Owner, Publisher & Editor **DOIJAD DNYANESHWAR BALAJIRAO,** Printer **SATISH VIJAY SONWANE**. Printed at **YASH PRINTERS & PUBLICATION HOUSE NO, 1-2-211, SHIVAJI NAGAR, NANDED**, Tq. Dist. **NANDED**, (Maharashtra) - 431602 M.S. & Published Near **AT POST. GAYATRI NAGAR, MUKHED TQ. MUKHED, DIST. NANDED-431715**
Email : shramiklokrajya@gmail.com

# उंद्रीच्या युवा शेतकऱ्याचा विक्रम

## १ एकरात तब्बल साडेतीन लाखांचे उत्पादन




**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**जाहूर (बालाजी शिंदे)**
मुखेड तालुक्यातील उंद्री (प.दे) येथील युवा आणि जिद्दी शेतकरी म्हणून परिचित असलेले उमाकांत गंगाधरराव सुर्यवंशी यांनी आधुनिक शेतीचे उत्तम उदाहरण घालत केवळ १ एकर शेतातून तब्बल ३.५० लाख रुपयांचे विक्रमी उत्पादन घेऊन परिसरातील शेतकऱ्यांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.मागील दोन वर्षांपासून सातत्याने त्यांनी टरबूज पिकाची लागवड केली असून,केवळ ६० दिवसांत तयार होणाऱ्या या अल्पकालीन पिकामुळे उत्पादन खर्चात मोठी बचत झाली आहे.

यंदा त्यांनी १ एकरात तब्बल १५ टन उत्पादन घेतले असून,प्रति टन २४,५०० रुपये बाजारभाव मिळाल्याने एकूण उत्पन्नाची रक्कम ३.५० लाखांवर पोहोचली.विशेष म्हणजे, एका वर्षात एकाच जमिनीत तीनपेक्षा अधिक वेळा लागवड करून उत्पादनक्षमता वाढवण्याची कौशल्यपूर्ण शेती तंत्रे उमाकांत यांनी विकसित केली आहेत.त्यामुळे खर्च कमी ठेवून उत्पादनात लक्षणीय वाढ साधता आली आहे.

शैक्षणिकदृष्ट्या औपचारिक शिक्षण कमी असतानाही मेहनत, जिद्द आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर यांच्या जोरावर त्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे.पिकाच्या व्यवस्थापनातील काटेकोरता आणि प्रयोगशील वृत्तीमुळे त्यांचे काम जिल्ह्यात सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे. उंद्रीतील या तरुण शेतकऱ्याचे आधुनिक शेतीकडे पाहण्याचे दृष्टिकोन आणि मेहनतीतून साधलेले यश हे परिसरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

**“शेती ही माझी ओळख आहे. शिक्षण कमी असलं तरी मेहनत, वेळेचं नियोजन आणि नव्या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेतीत अपार संधी आहेत.मागील दोन वर्षांपासून या पिकावर सतत प्रयोग केले.कमी कालावधीचं पीक असल्याने खर्च वाचतो आणि नफा वाढतो.एकाच जमिनीत वर्षात तीन वेळा लागवड केल्याने उत्पादनात मोठी वाढ झाली.माझ्या कामामुळे एखादा युवा शेतीकडे वळला, तर त्यापेक्षा मोठं समाधान नाही,” असे उमाकांत सुर्यवंशी यांनी सांगितले.**
**उमाकांत सुर्यवंशी**





### प्रा. डॉ. संग्राम आंदे यांना भारतीय गौरव प्रतिभा सन्मान

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**मुखेड -** महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड येथील समाजशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. संग्राम आंदे यांना प्रतिष्ठित भारतीय गौरव प्रतिभा सन्मान 2025 हा पुरस्कार घोषित झाला आहे. निती आयोग, भारत सरकार तर्फे दिला जाणारा हा पुरस्कार दिल्ली येथे विशेष समारंभात प्रदान करण्यात येणार आहे. शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन डॉ.आंदे यांची निवड करण्यात आली आहे. आतापर्यंत विविध क्षेत्रातील प्रभावी योगदानामुळे 71 पुरस्कारांनी त्यांचा गौरव झाला असून, त्यात या नव्या सन्मानाची भर पडली आहे. डॉ. आदे यांच्या कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अडकिने एस. बी., प्राचार्य गोणे सर, प्राचार्य मस्के सर, प्रा. आहेर सर आदींनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# पोलिस व महसुल पथकाची संयुक्त कार्यवाहीत एकूण २ कोटी २० लाख रुपयांचा अवैध रेती मुद्देमाल केला नष्ट

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**लोहा,(प्रतिनिधी)** पोलीस अधीक्षक नांदेड अविनाश कुमार यांनी "ऑपरेशन फ्लश आऊट" अंर्तगत सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध रेतीचा चोरटा उपसा करुन वाहतुक व विक्री करणारे इसमाविरुध्द कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते.त्या अनुषंगाने पोलीस स्टेशन उस्माननगर सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार यांसह पोलीस स्टेशन उस्माननगर चे पोलिस अधिकारी,टिमने व महसुल विभागाचे तहसीलदार विठ्ठल परळीकर व सज्जा मंडळ अधिकारी, ग्राम महसुल अधिकारी यांनी मोठी मोहीम राबवत धडक कार्यवाही केली. यात पोलिस व महसुल पथकाची संयुक्त कार्यवाहीत एकूण २ कोटी २० लाखाची अवैध रेती उपसा वर धडक कार्यवाही केली.संयुक्त कार्यवाही ने मुद्देमाल केला नष्ट केला.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,दि.१०.१२. २०२५ रोजी सकाळी ०७.०० वाजता येळी महाटी शिवारातील गोदावरी नदीलगत सिता नदीचे पात्रात अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड,श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक भोकर,सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड, मा.डॉ. अश्विनी जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग कंधार यांच्या मार्गदर्शनाखाली संजय निलपत्रेवार, सहायक पोलीस निरीक्षक, सुनिल सुर्यवंशी,पोलीस उप निरीक्षक आदींनी सात मोठे लोखंडी फायबर च तीन छोटे इंजीन बोटचे चालक मालक १) सात मोठे लोखंडी फायबर बोट किमंती १,७५,०००००/- रुपये (एक कोटी पंचाहत्तर लाख रुपये) जप्त मुद्देमाल २) तीन छोटे लोखंडी इजीन बोट किमंती ४५,०००००/- (पंचेचाळीस लाख रुपये), असा एकुण = २,२०,०००००/- (दोन कोटी वीस लाख रुपये) किमतींचा मुद्देमाल नष्ट केला.नांदेड पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी "ऑपरेशन फ्लश आऊट" अंर्तगत सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध रेतीचा चोरटा उपसा करुन वाहतुक व विक्री करणारे इसमाविरुध्द कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते.त्या अनुषंगाने पोलीस स्टेशन उस्माननगर सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार हे पोलीस स्टेशन उस्माननगर येथील वर पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार व महसुल विभागाचे तहसीलदार विठ्ठल परळीकर, व त्यांचेसोबत सज्जा मंडळ अधिकारी, ग्राम महसुल अधिकारी यांचेसह येळी शिवारातील गोदावरी नदीत अवैध रेती उपसाकरणारे यांचेविरुध्द छापा मारणे कामी गेलो असता गुप्तबातमीदारमार्फत गोपनीय माहीती मिळाली की, मौजे येळी, महाटी शिवारात गोदावरी नदीचे पात्रात काही इसम विनापरवाना लोखंडी मोठे फायबर बोट व छोटे लोखंडी इंजीन बोटच्या सहाय्याने गोदावरी नदी पात्रातुन रेतीचा (गौण खनिज) अवैध्य रित्या उपसा करीत आहेत अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने महसुल विभागाचे अधिकारी यांचे सह सदर ठिकाणी वेळ ०७.०० वाजता छापा मारला असता मोठे लोखंडी फायबर बोट किमंती १,७५,०००००/- व तीन छोटे लोखंडी इजीन बोट किमंती ४५,०००००/-असा एकुण किमंती २,२०,०००००/-रुपयाचा मुद्देमाल मिळून आला.त्यानंतर महसुल विभागाचे अधिकारी तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी सदर लोखंडी मोठे फायबर बोट व छोटे लोखंडी इंजीन बोट मालक व चालक यांनी शासनाची परवानगी घेतलेली नाही. सदरील रेतीचा अवैध उपसा करीत असल्याची खात्री झाल्याने त्याबाबत महसुल विभागाचे अधिकारी यांनी आमचे समक्ष यांनी सदर साहीत्याचा पंचासमक्ष रितसर पंचनामा करुन सदरचा मुद्देमाल हा जागीच नष्ट केला आहे. त्यानंतर सदर लोखंडी फायबर व लोखडी छोटे इंजीन बोट च्या मालकांची माहिती घेवुन त्यांचेविरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली .



**उस्माननगर पोलीस पथकाने अवैध रेती उपसा करणारे इसमांवर कारवाई करुन उत्कृष्ठ कामगीरी केल्याने अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी सपोनि संजय निलपत्रेवार , अधिकारी व अंमलदारांचे कौतुक करुन अभिनंदन केले आहे.**

# मानार प्रकल्पाचे पाणी शेतीला त्वरित उपलब्ध करून द्यावे - खा.राजू शेट्टी

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**बिलोली -** पाटबंधारे विभागाने मानार प्रकल्पाच्या रखडलेल्या व नादुरुस्त असलेल्या कॅनॉल व चारे यांची तातडीने दुरुस्ती करून शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष तथा माजी खासदार राजू शेट्टी यांनी बिलोली तालुक्यातील दुगाव येथे आयोजित पाणी परिषदेत बोलताना केली.
दुगाव येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते श्रीपत साळुंखे यांच्या पुढाकारातून पाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते,या परिषदेच्या अध्यक्षस्थानी खा. राजू शेट्टी यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकपर भाषणात श्रीपत साळूंके यांनी या भागातील शेतकऱ्यांच्या समस्या मांडल्या. यावेळी बोलताना खा. राजू शेट्टी म्हणाले की, १९७०-७५ च्या काळात मानार प्रकल्प उभारला गेला व त्याचे पाणी दुगाव ,कुंभारगाव ,तोरणा हरनाळा ,खपराळा ,कांगठी ,गुजरी कोळगाव कवठा व आरळी या गावातील शेतीला तिमाही व सामायिक पाणी मिळावे असे अपेक्षित होते परंतू अजूनही या गावातील शेतीला पाणी मिळाले नाही. मानार प्रकल्पाच्या क्षेत्राखाली ३३१० हे. शेती पाण्याखाली येईल अशी व्यवस्था आहे ,डावा कालवा ३० कि.मी. तर उजवा कालवा ३० कि.मी. प्रस्तावित केला गेला आहे पण नाल्यांची दुरुस्ती, वाढलेली झाडे झुडपे व काही शेतकऱ्यांनी फोडलेल्या बांधामुळे तसेच पाटबंधारे अधिकाऱ्यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे या भागातील शेतकरी पाण्यापासून वंचित आहेत अशी खंत त्यांनी व्यक्त केली त्यामुळे सदर कॅनॉल व चारे तातडीने दुरुस्त करून शेतकऱ्यांना पाणी मिळवून द्यावे अशा सूचना कार्यक्रमास उपस्थित पाटबंधारे उपअभियंता रामेश्वर पवार अभिजीत भोसले यांना केली.
शेजारच्या तेलंगणा राज्यातील साखर कारखाने महाराष्ट्रात येऊन ४५००रुपये भाव देतात तर १० कि.मी.अंतरावरील आमचे कारखानदार मात्र शेतकऱ्यांना तीन हजार रुपये भाव का देत नाहीत तसेच कोल्हापूर भागातील कारखानदार ३६००रुपये भाव व उचल त्वरित देतात मग इथला कारखानदार २४०० रुपये भाव कसा काय देतो असा सवाल खा. शेट्टी यांनी करीत शेतकऱ्यांनी हातात रुमणे घेऊन रस्त्यावर उतरण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले.
यावर्षी सोयाबीनचे उत्पादन कमी झाल्यामुळे सोयाबीनला भाव निश्चितपणे मिळणार आहे तेव्हा सोयाबीन विकण्याची घाई करू नये असा सल्ला शेतकऱ्यांना दिला . यावेळी प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ.प्रकाश पोपळे, हरिभाऊ कदम, डॉ.भगवान मनुरकर, हनमंत राजेगोरे, केदार साळूंके,व प्रहार संघटनेचे गजानन चव्हाण यांची या भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर भाषणे झाली.परिषदेस माधवराव पुयड सिंधीकर,किशनराव कदम,अंगद मुदखेडे, रावसाहेब शिंदे, दुगावच्या सरपंच पार्वतीबाई शंकरराव जाधव यांच्यासह परिसरातील असंख्य शेतकरी व संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.



### उसाचा पहिला हप्ता देण्यासाठी कारखानदारांची बैठक लावण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

**साखर कारखाने चालू होऊन ३९ दिवस उलटले तरी शेतकऱ्यांना उसाची पहिली उचल देखील मिळाला नाही याबद्दल आश्चर्य व्यक्त करीत जिल्ह्यातील सर्व कारखानदारांची तातडीने बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावावा अशा सूचना व्यासपीठावरुनच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व प्रादेशिक साखर संचालक विश्वास देशमुख यांना दूरध्वनी वरून केल्या त्यावर येत्या दोन दिवसात सर्व कारखानदारांची बैठक लावून हा प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी दिले**
**कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सरपंच प्रल्हाद भंडारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष हनुमंत कदम यांनी यांनी मानले.**